महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे
Rs.2/-
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ■ २२ जून २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ००१ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# रेडिओने संस्कृतीला आकार आणि अभिव्यक्तीला आवाज दिला

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे रेडिओ महोत्सवात प्रतिपादन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि. २१ :** महाराष्ट्र रेडिओ महोत्सव व आशा रेडिओ पुरस्कार सोहळयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विविध रेडिओ वाहीन्यांच्या सहा रेडिओ जॉकींनी प्रकट मुलाखत घेतली. या मुलाखतीद्वारे मुख्यमंत्र्यांनी आपल्या रेडिओवरील संगीत ऐकणे, गाने लिहीणे आदी छंदाविषयी मनमोकळा संवाद साधला. आपल्या आयुष्यातील रेडिओविषयक प्रसंगांचे वर्णन त्यांनी संवादाद्वारे केले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी शिघ्र कविता करीत गाणेही गायले. रेडिओचे महत्व पूर्वापासुन असून आजही ते अबाधीत असल्याचे सांगत रेडिओ अंतिम व्यक्तिपर्यंत पोहचण्याचे सशक्त माध्यम आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रेडिओचे महत्व अधोरेखीत केले.



मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, आमच्या लहानपणी दिवसाची सुरूवात सकाळी रेडिओ ऐकण्यापासून व्हायची. विविध भारती रेडिओ वाहिनीवर सकाळी येणारी गाणी अगदी न चूकता ऐकली जायची. त्यामुळे रेडिओशी लहानपणापासूनच जुळता आले. शासन दरबारी रेडिओ क्षेत्रात कार्यरत असलेल्या लोकांसाठी काही तरी केले पाहिजे, हा विचार सातत्याने होता. या पुरस्कार सोहळा आयोजनातून त्याचे समाधान लाभत आहे. रेडिओवर कार्यक्रम सुरू असताना माणूस दिसत नाही, पण सचित्र दर्शन शब्दांमधून घडत असते, असे विचार मुख्यमंत्री यांनी व्यक्त केले. जागतिक संगीत दिनाचे औचित्य साधून आयोजित महाराष्ट्र रेडिओ महोत्सव व आशा रेडिओ पुरस्कार सोहळयात रेडिओ जॉकी सिद्धू, अक्की, अर्चना, ब्रजेश, भूषण, सपना भट यांनी मुख्यमंत्र्यांची मुलाखत घेतली. या कार्यक्रमाचे समन्वयन हेनल मेहता यांनी केले. कार्यक्रमास सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, ज्येष्ठ गायिका महाराष्ट्र भूषण आशा भोसले, सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, संचालक विभीषण चवरे उपस्थित होते.

संगीत हे मानवामध्ये संवेदनशीलता आणत असून तणावमुक्तीचे कार्य करते. प्रवासात किंवा तातडीच्या समस्या येवून मनस्थिती बिघडत असल्यास हमखास संगीत ऐकावे. त्यामुळे मन शांत होऊन विचार क्षमता विकसित होते. रेडिओवर प्रेम करणाऱ्या असंख्य नागरिकांनी रेडिओवरील कार्यक्रमांना आपल्या जीवनाचा अविभाज्य भागही बनविले आहे. त्यामुळे रेडिओचे महत्व कधीही कमी होणार नाही, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले. रेडिओचे महत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ओळखून शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहचण्यासाठी 'मन की बात' कार्यक्रम सुरू केला. रेडिओ केवळ संगीत ऐकण्याचे साधन नाही, तर संवादाचेही माध्यम होऊ शकते, हे त्यांनी दाखवून दिले, अशा शब्दात पुन्हा एकदा रेडिओचे महत्व मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी विषद केले.

थोडक्यात महत्वाचे

# हिमोफिलिया औषधांसाठी केंद्राकडून ४५ कोटींचा निधी मंजूर




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई, ता. २० : केंद्राने जीवनरक्षक अँटी-हिमोफिलिक फॅक्टर (एएचएफ) चा पुरवठा थांबवल्यामुळे अनेक महिन्यांच्या रखडपट्टीनंतर राज्य सरकारने हिमोफिलियाच्या उपचारात वापरल्या जाणाऱ्या क्लॉटिंग फॅक्टर इंजेक्शन्सच्या तातडीच्या खरेदीसाठी ४५ कोटी मंजूर केले आहेत. यामध्ये फॅक्टर आठ, फॅक्टर सात, फिबा, फॅक्टर नऊचा समावेश आहे. ही आवश्यक औषधे हिमोफिलिया रुग्णांमध्ये प्राणघातक रक्तस्त्राव रोखण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत.

हिमोफिलिया हा एक दुर्मिळ आनुवंशिक रक्तविकार आहे. 'एएचएफ' हे मानवी शरीरात नैसर्गिकरीत्या तयार होणारे एक प्रथिन आहे; जे रक्त गोठण्यास महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. राज्य सरकारने काढलेल्या बुधवारी काढलेल्या परिपत्रकामध्ये या फॅक्टर खरेदीसाठी दिलेल्या मान्यतेचा उल्लेख करण्यात आला आहे. या मंजुरीमध्ये 'एएचएफ'च्या एक लाखांहून अधिक कुपी खरेदीचा समावेश आहे. यामध्ये फॅक्टर आठच्या २५,१४७ कुपी (व्हाइल्स), रीकॉम्बीनंट फॅक्टर आठच्या २१,८३५ व्हाइल्स, फॅक्टर नऊच्या १८,५२० व्हाइल्स आणि फिबाच्या ४,६०५ व्हाइल्सचा समावेश आहे. ही औषधे सरकारच्या आवश्यक औषधांच्या यादीत येतात आणि राज्यभर नियुक्त केलेल्या डे-केअर हिमोफिलिया केंद्रांद्वारे वितरित केली जातील.

**हिमोफिलिया म्हणजे काय?**

हिमोफिलिया हा एक आनुवंशिक रक्तविकार आहे; ज्यामध्ये शरीरात रक्त गोठण्याचे प्रथिने (गोठण्याचे घटक) कमी प्रमाणात असतात किंवा पूर्णपणे अनुपस्थित असतात. यामुळे किरकोळ दुखापत झाल्यासदेखील रक्तस्राव थांबत नाही. हिमोफिलिया सहसा जन्मापासूनच होतो आणि तो पालकांकडून मुलांमध्ये जनुकांद्वारे संक्रमित होतो. हा आजार पुरुषांमध्ये अधिक सामान्य आहे, तर महिला बहुतेकदा त्याच्या वाहक असतात.

# चिंचवलीत खैराची झाडांची चोरी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा दि. २१ (प्रतिनिधी)**

भिवंडी तालुक्यातील तालुका पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या दुर्गम भागातील चिंचवली येथील एका शेतकऱ्याच्या माळरानावरील खैराची झाडे चोरीला गेल्याने परिसरातील शेतकऱ्यांच्यात घबराट पसरली आहे. चिंचवली येथील शेतकरी गुरूनाथ गायकर यांनी त्यांच्या मालकीच्या ९७/७ या सर्वे नंबरच्या माळरानावरील जमीनीत खैराच्या झांडाची मोठी लागवड केली होती. त्यातील कात तयार करण्यासाठी खैराच्या झाडातील जो गर तयार व्हायला लागतो तो गर तयार झालेली ३० ते ४० वर्षापूर्वीची २ फुट जाडी असलेली २० खैराची मोठी झाडे अज्ञात चोरट्यांनी बुधवारी मध्यरात्री झाडे कापण्याच्या मशीनच्या सहाय्याने कापुन चोरी केल्याची घटना भिवंडी तालुक्यातील चिंचवली येथे घडली आहे. त्यामुळे गरीब शेतकऱ्याचे सुमारे साडेसात लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. त्याच दिवशी सकाळी चोरीची ही घटना शेतकरी गुरूनाथ गायकर यांच्या लक्षात येताच त्यांनी उपविभागीय अधिकारी(प्रांत) तहसीलदार भिवंडी, वनपरिक्षेत्र अधिकारी पडघा,परिमंडळ वनअधिकारी वडपा, वरीष्ठ पोलीस निरीक्षक भिंवडी तालुका यांना निवेदन देऊन सदर प्रकरणाची चौकशी करून चोरी करणाऱ्यावर कडक कायदेशीर कारवाई करुन मला न्याय द्यावा अशी मागणी केली आहे.

# अहमदाबाद विमान दुर्घटनेतील मयत दिपक पाठक यांच्यावर बदलापुरात अंत्यसंस्कार

## आमदार किसन कथोरेंनी घेतले अंत्यदर्शन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अहमदाबाद येथील भीषण विमान दुर्घटनेत दुर्दैवी मृत्यू झालेल्या एअर इंडिया विमानातील क्रू मेंबर श्री. दीपक पाठक यांचे पार्थिव आज अंत्यसंस्कारासाठी त्यांच्या बदलापूरच्या घरी आणण्यात आले. यावेळी त्यांच्या पार्थिवाचे अंतिम दर्शन घेऊन श्रद्धांजली अर्पण केली. तसेच पाठक कुटंबियांचे सांत्वन करून धीर दिला**

**बदलापूर :** अहमदाबाद विमान दुर्घटनेत मृत्यू झालेले बदलापुरकर दिपक पाठक यांना शनिवारी बदलापुरकरांनी शोकाकूल वातावरणात अखेरचा निरोप दिला. दिपक पाठक हे एयर इंडियाचे कर्मचारी आणि अहमदाबाद लंडन विमानात असलेल्या १२ क्रू मेंबरपैकी एक होते. त्यांच्या अंत्ययात्रेसाठी कुटुंबियांसह मित्र परिवार, एयर इंडियातील सहकारी आणि बदलापुकर उपस्थित होते.

# जीवनदीप खर्डी महाविद्यालयात योग दिन उत्साहात संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
:: नरेंद्र पाटील

जी. शै. सं. संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी येथे दि. 21 जून 2025 रोजी स.09:30 वा.'क्रीडा विभाग' आयोजित 'योग दिन' उत्साहात साजरा झाला. संयुक्त राष्ट्र संघटनेने दिलेल्या 2025 च्या थीम नुसार 'Yoga for one earth, one Health' या संकल्पनेवर आधारित हा कार्यक्रम होता .महाविद्यालयाचे प्राचार्य कैलास कळकटे, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी यांनी योगाचे प्रात्यक्षिक केले. जी. शै. सं.चे अध्यक्ष श्री. रवींद्र घोडविंदे यांच्या प्रेरणेने व प्राचार्य कैलास कळकटे सरांच्या मार्गदर्शन या कार्यक्रमाला लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य कैलास कळकटे यांनी विद्यार्थ्यांना,' दैनंदिन जीवनात योगासनाचे महत्व' सांगून मार्गदर्शन केले. क्रीडा विभाग प्रमुख प्रा. भूषण विशे यांनी योग अभ्यासातील विविध प्रात्याक्षिके सादर केली व उपस्थितांकडून करवून घेतली. क्रीडा विभागाच्या प्रा. सोनाली शेलार यांनी योग अभ्यासातील दंड, सूर्यनमस्कार याबाबत मार्गदर्शन केले. प्रा. दिपक विशे सर यांनी ध्यानधारणा, विविध हस्तमुद्रा याबाबत माहिती दिली व प्रात्यक्षिक करवून घेतले. या कार्यक्रमासाठी सर्व प्राध्यापक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







# योग ही भारतीय संस्कृतीची अमूल्य देणगी

## – आयुक्त राधाबिनोद शर्मा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने अप्पासाहेब धर्माधिकारी सभागृह, मिरा रोड (पूर्व) येथे सकाळी ठीक ८:०० वाजता भव्य योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रम मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रत्यक्ष उपस्थितीत उत्साहात पार पडला. कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, प्र. अतिरिक्त आयुक्त डॉ. सचिन बांगर, उपायुक्त (मुख्यालय) कल्पिता पिंपळे, उपायुक्त (महिला व बालकल्याण) कविता बोरकर, शहर अभियंता दिपक खांबित, तसेच इतर विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शालेय विद्यार्थी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिराच्या प्रारंभी प्रख्यात योग शिक्षिका यांनी उपस्थितांना योगाचे महत्व, योगासने, प्राणायाम व ध्यान याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी दैनंदिन जीवनात योगाचा सकारात्मक प्रभाव, विविध शारीरिक-मानसिक आरोग्य समस्यांवरील योगाच्या उपाययोजना, तसेच योगाभ्यासाची शास्त्रशुद्ध पद्धती यावर प्रकाश टाकला. विशेषतः धकाधकीच्या जीवनशैलीमुळे होणाऱ्या तणाव, निद्रानाश, मधुमेह, उच्च रक्तदाब इत्यादी आजारांपासून योगाने होणारा बचाव याचे प्रत्यक्ष उदाहरणासह विवेचन करण्यात आले. यानंतर आयुक्त राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांच्या उपस्थितीत, सर्व विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक यांनी एका तासाचा सामूहिक योगाभ्यास केला. योग शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली भस्त्रिका, अनुलोम-विलोम, कपालभाती, ताडासन, भुजंगासन यासारख्या विविध आसनांचा सराव करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रसंगी आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी सर्व उपस्थितांना उद्देशून प्रेरणादायी मार्गदर्शन करताना सांगितले की, योग ही भारतीय संस्कृतीची अमूल्य देणगी आहे. योग हा फक्त एक दिवस साजरा करण्याचा उत्सव नसून तो जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनवायला हवा. प्रत्येक नागरिकाने दररोज किमान एक तास योगाभ्यास करण्याचा संकल्प करावा, जेणेकरून आपले शरीर, मन आणि समाज आरोग्यदृष्ट्या सक्षम होईल. तसेच, मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी पुढे होऊन योगप्रसाराचे दूत बनावे आणि आरोग्यपूर्ण जीवनशैली अंगीकारावी, असे आवाहन यावेळी त्यांनी केले.









# गीतासार



## अध्याय १४
## गुणत्रयविभागयोगः

सत्त्वं सुखे सञ्जयति रजः कर्मणि भारत । ज्ञानमावृत्य तु तमः प्रमादे सञ्जयत्युत ॥ १४-९ ॥

हे भारता (अर्थात भरतवंशी अर्जुना), सत्त्वगुण सुखाला, रजोगुण कर्माला तसेच तमोगुण ज्ञानाला झाकून प्रमाद करण्यालाही प्रवृत्त करतो. ॥ १४-९ ॥

रजस्तमश्चाभिभूय सत्त्वं भवति भारत । रजः सत्त्वं तमश्चैव तमः सत्त्वं रजस्तथा ॥ १४-१० ॥

हे भारता (अर्थात भरतवंशी अर्जुना), रजोगुण आणि तमोगुण यांना दडपून सत्त्वगुण वाढतो. सत्त्वगुण आणि तमोगुण यांना दडपून रजोगुण वाढतो. तसेच सत्त्वगुण आणि रजोगुण यांना दडपून तमोगुण वाढतो. ॥ १४-१० ॥

सर्वद्वारेषु देहेऽस्मिन्प्रकाश उपजायते । ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्त्वमित्युत ॥ १४-११ ॥

ज्यावेळी या देहात तसेच अंतःकरणात व इंद्रियांत चैतन्य आणि विवेकशक्ती उत्पन्न होते, त्यावेळी असे समजावे की, सत्त्वगुण वाढला आहे. ॥ १४-११ ॥

लोभः प्रवृत्तिरारम्भः कर्मणामशमः स्पृहा । रजस्येतानि जायन्ते विवृद्धे भरतर्षभ ॥ १४-१२ ॥

हे भरतर्षभा (अर्थात भरतवंशीयांमध्ये श्रेष्ठ अर्जुना), रजोगुण वाढल्यावर लोभ, प्रवृत्ती, स्वार्थाने प्रेरित होऊन फळांच्या इच्छेने कर्मांचा आरंभ, अशांती आणि विषयभोगांची लालसा ही सर्व उत्पन्न होतात. ॥ १४-१२ ॥

# रेसिपी
## बटाट्याचे धिरडे



**साहित्य-**

बटाटे - तीन मध्यम आकाराचे किसलेले ,कांदा - एक बारीक चिरलेला ,हिरवी मिरची - दोन बारीक चिरलेला, कोथिंबीर - दोन टेबलस्पून ,बेसन - तीन टेबलस्पून ,मीठ चवीनुसार ,तिखट - अर्धा टीस्पून ,गरम मसाला - १/४ टीस्पून ,तेल

**कृती-**

सर्वात आधी एका मोठ्या भांड्यात बटाट्याचा किस, चिरलेले कांदे, हिरवी मिरची, कोथिंबीर, बेसन, मीठ, तिखट आणि गरम मसाला घाला आणि चांगले मिसळा. जर मिश्रण खूप कोरडे वाटत असेल तर तुम्ही थोडे पाणी घालू शकता, परंतु लक्षात ठेवा की पीठ घट्ट राहील. आता एक नॉन-स्टिक पॅन गरम करा आणि त्यावर थोडे तेल घाला. मिश्रणाचा एक छोटासा भाग घ्या आणि ते तव्यावर पसरवा आणि थोडेसे सपाट करा. आता मंद आचेवर दोन्ही बाजूंनी सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत शिजवा. तयार बटाट्याचे धिरडे एका प्लेटमध्ये काढा व हिरवी चटणी किंवा टोमॅटो सॉससोबत गरमागरम सर्व्ह करा.



## "Waste To Best" या पर्यावरणरक्षक उपक्रमांतर्गत टेरेस गार्डन' ची उभारणी

Waste To Best" या पर्यावरणरक्षक उपक्रमांतर्गत ठाणे जिल्हा माहिती कार्यालय, वेसाक इंडिया आणि आसरा फाउंडेशन यांच्या संयुक्त प्रयत्नांनी जिल्हा माहिती कार्यालयाच्या "टेरेस गार्डन" ची उभारणी पूर्ण झाली आहे. या माध्यमातून इच्छुकांना पर्यावरण रक्षण, टेरेस गार्डन, झाडांची निगा राखणे इत्यादी पर्यावरण पूरक उपक्रमांचे प्रशिक्षणही देण्यात येणार आहे. याविषयीची अधिक माहिती माननीय जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना देण्यासाठी आज पर्यावरण तज्ञ श्री.विजयकुमार कट्टी आणि जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांनी त्यांची प्रत्यक्ष भेट घेतली. पर्यावरणपूरक उपक्रमांची माहिती माननीय जिल्हाधिकारी महोदयांना देण्यापूर्वी श्री.विजयकुमार कट्टी यांनी "waste material" मधून साकारलेली एक सुंदरशी कलाकृती जिल्हाधिकारी श्री.शिनगारे यांना भेट म्हणून दिली.

## एल.डी. सोनवणे महाविद्यालयाचा पदवी प्रदान सोहळा

सोमय्या विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता डॉ. सतीश पांडे जी, सोनवणे महाविद्यालयाचे सरचिटणीस डॉ. विजय पंडित, उपाध्यक्ष श्री. वासनजी देढिया, प्राचार्य ॲनी ॲंटनी मॅडम, उपप्राचार्य मोरे सर... एल.डी. सोनवणे महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित "प्रदेश समारोह" मध्ये "पदवीधर आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना" पदवी प्रदान करताना...





रविवार,15 जून 2025 @प्रशिक्षण क्षेत्रातील तीर्थक्षेत्र, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी उत्तन येथे त्यांच्याकडून सेवा सहयोग फाउंडेशनच्या 100+ अभ्यासिका प्रमुखांसाठी आयोजित "सुमन शिबिराचा" समारोप करण्याची संधी मिळाली.मी हा एक अविस्मरणीय सन्मान मानतो. धन्यवाद सेवा सहयोग फाउंडेशन आणि रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी. विशेष आभार: फोटोतील श्री. राहुल टोकेकर, श्रीम. चैताली (रा. म्हा. प्र.) श्रीम. गीताताई मोघे, संदेश घरत (सेवा सहयोग फाउंडेशन)

# ठाणे जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय योग दिन
## विविध योग प्रात्यक्षिकांनी साजरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे जिल्हा प्रशासन आणि ठाणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने तालुका क्रीडा संकुल येथे आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आमदार निरंजन डावखरे, प्र. उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सचिन चौधर, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गंगाधर परगे, नेहरू युवा केंद्राच्या जिल्हा समन्वयक मनिषा शर्मा, तालुका क्रीडा अधिकारी सायली जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार



विजेती पूजा सुर्वे यांचीदेखील विशेष उपस्थिती होती.

याप्रसंगी ब्रह्माकुमारी, पतंजली योग केंद्राचे साधक अनुयायी, जिल्हा प्रशासनातील इतर अधिकारी-कर्मचारी, योग साधक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यानिमित्ताने उपस्थित सर्वांनी योग प्रात्यक्षिके केली आणि आजच्या धकाधकीच्या आयुष्यात दैनंदिन गरज असलेल्या योग साधनेचा नित्यनियमाने सराव करण्याचा संकल्पही केला.

## मुरबाड पोलीस ठाणे कम्युनिटी हॉलमध्ये
# योगा दिनानिमित्त मार्गदर्शन
## विविध ठिकाणी वृक्षारोपण !



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : आंतरराष्ट्रीय योगा दिनाच्या अनुषंगाने मुरबाड पोलीस ठाणे कम्युनिटी हॉल मध्ये ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. स्वामी डि.एस.यांच्या नेतृत्वाखाली तसेच मुरबाड वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप गीते यांच्या मार्गदर्शनाखाली योगा दिनाचे आयोजन करण्यात आले होते. पतंजली योगधामचे योगाचार्य प्रकाश शिंगोळे व त्यांची टीम यांनी मार्गदर्शन केले मुरबाड पोलीस ठाणेचे अधिकारी अंमलदार सहभागी झाले होते. तसेच कुडवली चौकी येथे आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्त वृक्षारोपण करण्यात आले

## उल्हासनगर येथे
# जागतिक योग दिवस साजरा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर** : यंदाचा ११वा जागतिक योग दिवस हा उल्हासनगर येथील गोल मैदानात भगवंती नवानी व्यासपीठाच्या प्रांगणात भव्य प्रमाणात साजरा करण्यात आला. या योग दिनासाठी उल्हासनगर व कल्याण येथील जवळ जवळ ३२ विविध योग संस्था एकत्रित पणे सहभागी झाल्या होत्या. यात स्वस्थ भारत योगा केंद्र, श्री श्री रवीशंकर, अंबिका योग कुटीर, पतंजली योग पीठ, ओशो संस्था अशा एकुण ३२ संस्थांचे अनुयायी शेकडोच्या संख्येत उपस्थित होते. सुरवातीला प्रोटोकॉलनुसार सर्व अनुयायांनी योगासने व प्राणायाम यांचा अभ्यास केला. यानंतर या संस्थांच्या विविध अनुयायांनी गणेश वंदना, स्थिर सुखम आसनम अशी विविध प्रात्यक्षिके केली. तसेच उल्हासनगरचे आमदार कुमार ऐलानी यांचे या भव्य कार्यक्रमासाठी मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले भाजपचे महाराष्ट्राचे कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण हे उपस्थित होते. तसेच अतिथींमध्ये भाजपच्या राज्य सचिव ॲड.माधवी नाईक व भाजपचे उल्हासनगर जिल्हाप्रमुख राजेश वाध्य हेही उपस्थित होते. या सर्व अतिथींनी सर्व उपस्थित साधकांसह योगाभ्यास केला.

# शहापुरातील विद्युत समस्या दूर करण्याची जिजाऊच्या हरेश पष्टे यांची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापुर** : शहापुर शहरातील विजेच्या लपंडावामुळे नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने घरात अनेक समस्या येत आहेत या संदर्भात जिजाऊ संघटनेचे शहापुर विधानसभा प्रमुख, नगरपंचायत नगरसेवक व कृषी उत्पन्न समितीचे संचालक हरेश पष्टे यांनी शहापुरातील वीज वितरण कंपनी च्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन या समस्या लवकरात लवकर दूर करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे

शहापूर शहरातील जीर्ण विद्युत लाईन बदलण्यात यावी,विद्युत वाहिन्या जुनाट व खराब झाल्याने वारंवार शॉर्टसर्किट होऊन वीजपुरवठा खंडित होणे त्यामुळे घरगुती उपकरणांचे नुकसान, तसेच नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होत आहे.तर विद्युत वाहिन्या अनेक ठीकठिकाणी झाडांमध्ये अडकल्या आहेत, पोल वाकलेले आहेत, काही ठिकाणी केबल पूर्णतः झपाट्याने



खराब होऊन गळकी झाली आहेत.तर काही ठिकाणी कमी व्हॅटचे रोहित्र असल्याने कमी जास्त प्रमाणात विद्युत प्रवाह होत असल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा

**'शहापुर शहरात दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत असल्याने जुन्या रोहित्रावरील विजेचा भार वाढत असल्याने तांत्रीक बिघाड होऊन वीज खंडित होत असते त्यामुळे येथील जुने रोहित्र बदलून जास्तक्षमता असलेले रोहित्र बसवण्यात यावे.'**
**- हरेश पष्टे, अध्यक्ष, शहापुर विधानसभा,जिजाऊ संघटना.**

लागत आहे. या अडचणी लवकरात लवकर सोडवण्यासाठी हरेश पष्टे यांनी निवेदन दिले आहे. यावेळी कल्याणचे महावितरण कार्यकारी अभियंता चे विनय काळे, शहापूरचे उपअभियंता आशिष रॉय व सहाय्यक अभियंता एन. डगले उपस्थित होते. विजेच्या तारा व पोल बदलण्याचे काम लवकरच हाती घेण्यात येणार असल्याचे यावेळी महावितरण चे कार्यकारी अभियंता विनय काळे यांनी सांगितले..

# काहिजण केवळ अर्थकारणात व्यस्त
## अरविंद वाळेकरांचा विरोधकांना टोला

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ** : नवीन शैक्षणिक वर्षात राज्यभरात विद्यार्थ्यांचे वेगवेगळ्या प्रकारे शाळा प्रवेशोत्सव साजरे होताहेत . अंबरनाथ शिवसेना शहर शाखेच्या वतीने शहरातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य आणि नागरिकांना छत्री वाटप करण्यात आले. औचित्य होते शिवसेनेच्या वर्धापनदिनाचे. अंबरनाथ शिवसेना शहरप्रमुख अरविंद वाळेकर यांच्या नेतृत्वात हा सोहळा मान्यवरांच्या उपस्थित पार पडला.

अंबरनाथ शिवसेनेच्या माध्यमातून हा उपक्रम दरवर्षी संपन्न होतो. यावर्षी देखील अंबरनाथ शहराच्या हद्दीतील प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांना वह्या आणि दप्तर यांचे मोफत वाटप झाले. तसेच, पावसासाठी आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांना छत्र्याही वाटप करण्यात आल्यात. अंबरनाथ पुर्वेकडील शिवसेना मध्यवर्ती शाखेत साधारण ७ हजार पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी वही आणि दप्तरचा



अंबरनाथ शिवसेनेतर्फे शालेय साहित्य व छत्री वाटप...

लाभ घेतला.

यावेळी कार्यक्रमाच्या आयोजना मागिल उद्देश व्यक्त करतांना, शहर प्रमुख अरविंद वाळेकर म्हणाले की, शिवसेनेच्या स्थापने पासून बाळा साहेबांनी दिलेला राजकाराणा पेक्षा अधिक समाज कारणाचा मार्गावर आम्ही चालतो. या नुसार विद्यार्थी व नागरिकांच्या अशा लोकोपयोगी उपक्रमांमुळे चेहर्यावर मिळणारा आनंद आम्हाला लाख मोलाचा वाटतो. समाजाची नेमकी गरज आम्ही जाणतो.

अंबरनाथ मध्ये काहिजण बाळासाहेब ठाकरे यांचा मुलमंत्र विसरुन ८० टक्के अर्थकारण व २० टक्के समाजकारण करीत आहेत. असा टोलाही वाळेकर यांनी विरोधक, आमदार बालाजी किणीकर गटाला मारला. या उपक्रमास अरविंद वाळेकर, माजी नगराध्यक्षा मनिषा वाळेकर, युवानेते निखिल वाळेकर, अरविंद मालुसरे, नीता परदेसी, चंदा मिलिंद गान, योगेश गोरे, दीपक पवार, राजेश शिर्के, शिवसेना महिला, युवा पदाधिकारी उपस्थित होते.

## शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने
# मोफत दाखले वाटप शिबीर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा विधिमंडळ गटनेते सन्मा.आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच ठाणे जिल्हा अध्यक्ष सुहास देसाई यांच्या नेतृत्वाखाली ठाणे जिल्हा असंघटित कामगार सेल अध्यक्ष राजू चापले यांनी चंदनवाडी, ठाणे येथे आयोजित केलेल्या मोफत दाखले वाटप शिबिराचे आयोजन 21 व 22 जून रोजी करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी



महाराज यांना ठाणे जिल्हा अध्यक्ष सन्मा. सुहास देसाई साहेब यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करत अभिवादन करून सुरुवात करण्यात आली यावेळी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन मा. नगरसेवक सुहास देसाई साहेब यांनी केले. यांप्रसंगी मा. नगरसेवक मिलिंद बनकर, ठाणे जिल्हा व्यापारी अध्यक्ष संजीव दत्ता, ठाणे जिल्हा ओबीसी अध्यक्ष गजानन चौधरी, ठाणे जिल्हा ज्येष्ठ नागरिक अध्यक्ष दिलीप नाईक, ठाणे जिल्हा प्रशासन सरचिटणीस राजेश साटम, ठाणे शहर उपाध्यक्ष शिवा कालुसिंग, ठाणे शहर युवक उपाध्यक्ष आशिष खाडे यांच्यासह स्थानिक रहिवाशी उपस्थित होते.



## आजचे राशिभविष्य

**मेष**
तुमच्या बजेटची काळजी घ्या. जवळच्या मित्राशी किंवा नातेवाईकाशी काही मतभेद होऊ शकतात. इतरांच्या रागापुढे तुमची शक्ती वाया घालवू नका.

**वृषभ**
गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेला व्यस्तता आज कमी होईल. आज आपण स्वतःसाठीही थोडा वेळ काढू. मानसिक शांती मिळेल.

**मिथुन**
तुम्हाला काही विशेष यश प्राप्त होणार आहे.म्ही तुमच्या कौटुंबिक वातावरण आणि कार्यक्षेत्रात समन्वय राखला पाहिजे, तुम्ही आनंदी व्हाल.

**कर्क**
वडिलधाऱ्यांचा आणि ज्येष्ठांचा आदर कमी होणार नाही. जवळची नाती बिघडण्यापासून वाचवण्यासाठी हार मानावी लागली तर लाज वाटू नका.

**सिंह**
जे राजकारणी क्षेत्राशी निगडित आहेत, त्यांचा मान-सन्मान वाढेल आणि त्यांना पक्षातही मोठे पद मिळू शकेल. भावनेच्या भरात चुकीचा निर्णय घेऊ शकता .

**कन्या**
मनापासून मन लावून काम करा.मेहनतीचे फळ न मिळाल्याने आज कामाच्या ठिकाणी काहीसे दुःख होईल. वरिष्ठ व्यक्तीचा सल्ला घ्या.

**तूळ**
काही प्रलंबित पेमेंट प्राप्त होऊ शकते किंवा उत्पन्नाचे काही थांबलेले स्त्रोत देखील पुन्हा सुरू होऊ शकतात. गरजूला मदत केल्याने आनंद मिळेल.

**वृश्चिक**
नम्र स्वभावामुळे घरात आणि समाजात तुमची प्रशंसा होईल. नात्यात गोडवा आणण्यासाठी नकारात्मक गोष्टींकडे दुर्लक्ष करून संवाद गरजेचा आहे.

**धनु**
गुंतवणुकीसाठी काळ अतिशय अनुकूल आहे. तसेच घरातील बदलांशी संबंधित विषयांवर महत्त्वपूर्ण चर्चा होणार आहे. व्यवसायात फायदा होईल.

**मकर**
तुम्ही दूरवरच्या व्यावसायिक पक्षांशी तुमचे संबंध दृढ करा. त्यांच्यामार्फत तुम्ही महत्त्वाचे करार मिळवू शकता.नोकरीसाठी लाभाचे संकेत आहेत.

**कुंभ**
उत्पन्न वाढू शकते. आज तुमचा जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टीकोन तुम्हाला प्रत्येक परिस्थितीत आनंदी कसे राहायचे हे दर्शवेल.

**मीन**
तुमची जीवनशैली आणि बोलण्याची पद्धत लोकांना तुमच्याकडे आकर्षित करेल. घरातील काही शुभ कार्य पूर्ण करण्यासाठी योजना बनतील.






### कल्याण डोंबिवली महापालिकेतर्फे

# आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



**'योग हा केवळ एका दिवसासाठी नव्हे, तर ती रोजची सवय असावी' - आयुक्त अभिनव गोयल**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, आर्ट ऑफ लिव्हिंग आणि एसकेडीसीएल यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर कल्याण स्थानकाजवळील कै. दिलीप कपोते वाहनतळाच्या सहाव्या मजल्यावर आयोजित करण्यात आले होते.



या कार्यक्रमात महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी आपल्या मनोगतात योगाचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, "योग ही एखाद्या दिवसापुरती उत्सवाची गोष्ट नसून, ती आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग असावी. जसे गाड्यांना वेळोवेळी सर्व्हिसिंगची गरज असते, तसेच आपल्या मनालाही विश्रांती, एकाग्रता व सकारात्मकतेसाठी योगाची गरज असते."या योग शिबिरात महापालिकेचे महापालिका आयुक्तांसमवेत उपायुक्त रमेश मिसाळ, कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे, शिक्षणाधिकारी विजय सरकटे तसेच इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग सहभागी झाला होता.आर्ट ऑफ लिव्हिंगचे जेष्ठ प्रशिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली श्वसन तंत्र, आसने व मानसिक शांततेसाठी विविध आसन प्रकार शिकवण्यात आले. महापालिका क्षेत्रातील शाळा तसेच महाविद्यालयांमध्येही शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध योगासने करीत योगाभ्यासाचा लाभ घेतला.

### भारतीय जनता पक्षातर्फे

# 'जागतिक योग दिवस' उत्साहात साजरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील)** : निरोगी शरीर आणि स्वस्थ मनाचे महत्त्व संपूर्ण जगाला पटवून देणाऱ्या योग म्हणजेच योगाभ्यासानिमित्त संपूर्ण जगभरात 21 जून हा जागतिक योग दिवस म्हणून साजरा केला जातो. त्याचे निमित्त साधून भारतीय जनता पक्षातर्फे कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातील पाचही मंडलंांमध्ये जागतिक योग दिवस साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे भाजपच्या या मंडलांमध्ये झालेल्या 30 हून अधिक कार्यक्रमांमध्ये माजी आमदार नरेंद्र पवार यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतल्याचे दिसून आले.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्रसंघात २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित करण्याची मागणी केली होती. १७७ देशांच्या पाठिंब्यामुळे ही संकल्पना मंजूर झाली आणि २१ जून २०१५ पासून जगभरात सर्वत्र हा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जातो. योग ही भारताने संपूर्ण जगाला दिलेली प्राचीन आणि अमूल्य देणगी असून शारीरिक आणि मानसिक आरोग्य टिकवण्यासाठी तो अत्यंत प्रभावी साधन आहे.



## माजी आमदार नरेंद्र पवार ३० हून अधिक ठिकाणच्या कार्यक्रमात सहभागी

याच पार्श्वभूमीवर भाजपा जुने कल्याण मंडल अध्यक्ष अमित धाक्रस, भाजप जुने कल्याण मंडल महिला मोर्चा अध्यक्षा हेमलता नरेंद्र पवार, भाजप नवीन कल्याण मंडल अध्यक्ष स्वप्निल काठे, भाजप मोहने टिटवाळा मंडल अध्यक्ष नवनाथ पाटील, भाजप टिटवाळा मंडल अध्यक्ष शक्तीवान भोईर व माजी उपमहापौर उपेक्षा भोईर तसेच भाजपा महिला मोर्चा प्रदेश सचिव प्रिया शर्मा यांच्या माध्यमातून कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघात ठिकठिकाणी योगा प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये माजी आमदार नरेंद्र पवार यांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग घेत विविध योगासने केली. भारतीय जनता पक्षातर्फे आयोजित या सर्व योग प्रात्यक्षिक कार्यक्रमांमध्ये कल्याणातील पतंजली योग समितीच्या प्रतिनिधींनी योगशिक्षक म्हणून भूमिका बजावली. तसेच भाजप मध्य कल्याण मंडल, भाजप मोहने मंडल, भाजप टिटवाळा मंडल, योग कुटीर संस्था, सना फिटनेस योगा क्लासेल आणि विवेकानंद योग अनुसंधानच्या डॉ. ममता मिश्रा यांच्या माध्यमातूनही योग दिनानिमित्त योग शिबिर आयोजित करण्यात आले होते. यापैकी विवेकानंद योग अनुसंधानच्या योग शिबिरालाही माजी आमदार नरेंद्र पवार यांनी उपस्थिती दर्शवली.

आजच्या धकाधकीच्या जीवनात योग हे एक अत्यावश्यक साधन बनले आहे. योगाचे नियमित सराव केल्यास आरोग्य सुधारते आणि जीवन अधिक शांत आणि समतोल होते. निरोगी जीवनासाठी आपण सर्वांनी दररोज काही वेळ योगासाठी द्यायला हवा असे आवाहन माजी आमदार नरेंद्र पवार यांनी यावेळी केले. तसेच आजच्या जागतिक योग दिनानिमित्त त्यांनी उपस्थित सर्वांना शुभेच्छाही दिल्या.

## शिवसेनेच्या पुढाकाराने तरुणांना करिअर संधी

**डोंबिवली** : शिवसेना डोंबिवली आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिका, लाईट हाऊस कम्युनिटी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शिवसेना मध्यवर्ती शाखा डोंबिवली यांच्या नेतृत्वाखाली मोफत कौशल्य कोर्स आणि नोकरीची संधी तरुण तरुणींना करिअर करून नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यात आली. सदर दोन दिवसीय मोफत शिबिराचे उद्घाटन कल्याण ग्रामीण आमदार राजेश मोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघ आमदार राजेश मोरे, सदानंद थरवळ, बंडू पाटील, महिला जिल्हा संपर्क संघटक कविता गावंड, शिल्पा मोरे, प्रतिभा पांचाळ, मंदा वारे, अपर्णा, मयुरी पिंपळकर, रिचा परब आदी उपस्थित होते. पहिल्या दिवशी शनिवार 21 तारखेला सकाळी 11 ते 6 यावेळेत मध्यवर्ती शिवसेना शाखा, डोंबिवली येथे मोठ्या संख्येने तरुण तरुणी उपस्थित होते. कौशल्य केंद्राच्या माध्यमातून मोफत कोर्सेस शिकविण्यात आले. कौशल्य केंद्रात एसी फ्रीज रिपरिंग, ऑफिस एक्झिक्युटिव्ह, अकाऊंट एक्झिक्युटिव्ह, इलेक्ट्रिशन, ऑटो सर्व्हिस, बी एफ एस आय, नर्सिंग असिस्टंट, ब्युटी पार्लर, फॅशन डिझाईन, हॉटेल मॅनेजमेंट आदींचे मोफत प्रशिक्षण मिळणार आहे. तरुण तरुणींनी या केंद्रातून प्रशिक्षण घेतल्यानंतर त्यांना त्वरित नोकरीची संधी उपलब्ध होऊ शकेल असा विश्वास कविता गावंड यांनी यावेळी व्यक्त केला.

## चौथी सीटवर कारवाईला विरोध करत रिक्षा बंद



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : शहरावत चौथी सीट बसविणाऱ्या रिक्षाचालकांवर 10 हजार रुपये दंड आकारला जाते आहे. याचा विरोध करत शनिवारी 21 तारखेला सायंकाळच्या सुमारास डोंबिवली पूर्वेकडील इंदिरा चौकात रिक्षा बंद करण्यात आल्या. कारवाई नको अशी मागणी रिक्षाचालकांनी करत जोवर यावर निर्णय होत नाही तोवर रिक्षा रस्त्यावर धावणार नाही असा पवित्रा घेतला. काही रिक्षाचालकांनी आपला मोर्चा डोंबिवली रामनगर पोलिस ठाण्याकडे वळवला. कामावरून थकून आलेल्या प्रवाशाना रिक्षा मिळत नसल्याने काही प्रवाशांनी शिवसेना मध्यवर्ती शाखेत आमदार राजेश मोरे यांची भेट घेऊन माहिती दिली.

यामुळे आमदार मोरे यांनी स्वतः इंदिरा चौकात जाऊन प्रवाशांना रिक्षात व परिवहन बसेस मध्ये बसविले. रिक्षा युनियचे नेते नंदू परब यांनी कल्याण शीळ रोडवरील विको नाका येथे 24 तारखेला ठिय्या आंदोलन करू असा इशारा दिला. तर रिक्षा युनियनचे अध्यक्ष सुदाम जाधव यांनी 24 तारखेला डोंबिवलीत रिक्षा बंदची हाक दिली.

# श्री विभूती विद्यालयाने रॅलीचे माध्यमातून दिला योगाचे महत्त्वाचा संदेश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : पंतप्रधान महोदयांनी 2014 च्या राष्ट्रीय महासभेत दिनांक 21 जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून दरवर्षी साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच संयुक्त राष्ट्रसंघाने 21 जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला आहे. त्याअनुषंगाने दि. 21 जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून जगभरात साजरा करण्यात येतो. याचे औचित्य साधून श्री विभूती प्रकाशानंदजी विद्यालय इंदिरानगर, वागळे इस्टेट, ठाणे चे मुख्याध्यापक कुँवर राकेश सिंह तोमर यांचे मार्गदर्शनाखाली योग दिनाचे महत्व लोकांपर्यंत पोहोचवणे, योगामुळे होणारे फायदे लोकांपर्यंत पोहोचवणे, लोकांना नियमित योगा करण्यासाठी प्रोत्साहित करणेसाठी इंदिरानगर परिसरात योग रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.सदर रॅलीमध्ये 8 वी ते 10 चे विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी हातात बॅनर व घोषणा देत योगाची जनजागृती करत व्यक्तीच्या शारीरिक व आत्मिक विकासासाठी योगविद्या सहाय्यभूत असल्याचा संदेश दिला.

यावेळी सहायक शिक्षक संतोष सिंह, सत्यप्रकाश सिंह, सफातुल्ला खान, अर्जुन चेमटे, विनोद राठोड, संतोष आर.सिंह, धनंजय देसले, विनोद परदेशी, सुनील प्रजापती, गणेश कांगणे, प्रियंका सिंह, संजय मार्कंडेय विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

**विद्यार्थ्यांनी हातात बॅनर व घोषणा देत योगाची जनजागृती करत व्यक्तीच्या शारीरिक व आत्मिक विकासासाठी योगविद्या सहाय्यभूत असल्याचा संदेश दिला.**



# कल्याणमध्ये पोलिसांचा देखील योगाभ्यास

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त कल्याण परिमंडळ 3 चे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांच्या उपस्थितीत खडकपाडा पोलीस स्टेशनच्या वतीने वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ अमरनाथ वाघमोडे यांच्या नेतृत्वाखाली सकाळी 6:30 वाजता कल्याण पश्चिमेतील वरटॅक्स बिल्डिंग वायले नगर येथे योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या योगा कार्यक्रमाचे तीन सत्रात आयोजन करण्यात आले होते. प्रथम सत्रात विविध ग्रुपने सांगीतिक योग प्रकार सादर केला तर मीनल जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र स्टेट योग साधना असोसिएशनच्या चिमुकल्या बाल मंडळीने संगीताच्या तालावर विविध आसने सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी पोलीस उप आयुक्त परिमंडळ 3 कल्याण मधील सर्व पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी आणि अंमलदार, तसेच ज्येष्ठ नागरिक संघ, रोटरी क्लब ऑफ कल्याण सिटी, शाळा , कॉलेजचे विद्यार्थी, शिक्षक आणि विविध सामाजिक संस्था तसेच योग ग्रुप चे सदस्य असे मोठ्या प्रमाणात नागरिक या कार्यक्रमात सहभागी झाले होते.



विशेष म्हणजे वय वर्ष तीन ते वय वर्ष 92 पर्यंतच्या योग साधकांनी सदर शिबिरात सहभाग घेतला. यावेळी सर्व सहभागी योगा ग्रुप व सामाजिक कार्यकर्ते व संस्था यांना प्रमुख पाहुण्यांचे हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता खडकपाडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अमरनाथ वाघमोडे यांच्या नेतृत्वाखाली प्रशांत अहिरे, सुनील वायले, प्रीतम चौधरी, प्रोजेक्ट चेअरमन मदन शंकलेशा, पोलीस नीरिक्षक संदीप शिवले, पोलीस उपनिरीक्षक अर्जुन डोमाडे, पोलीस हवालदार साहेबराव पाटील , पोलिस कॉन्स्टेबल तुषार सितान यांनी विशेष परीश्रम घेतले.

# मुलांच्या रक्तातील शिसे प्रमाण तपासणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**वासिंद** : व्हायट स्ट्राटेजिस संस्था व प्राथमिक आरोग्य केंद्र वासिंद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित येथील लहान मुलांच्या रक्तातील शिसेचे प्रमाण तपासणी करण्यात आली.

ठाणे जिल्हा परिषद आरोग्य विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली तर व्हायट स्ट्राटेजिस, संस्था व प्राथमिक आरोग्य केंद्र वासिंद यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मुलांची तपासणी करून रक्तातील शिसेच्या जास्त प्रमाणामुळे उद्भवणाऱ्या समस्या, आजार व व्याधी याबाबत माहिती देण्यात आली. यावेळी व्हायट स्ट्राटेजिस संस्थेच्या अध्यक्षा सुमी मेहता, वरिष्ठ तांत्रिक सल्लागार इलू, महाराष्ट्र शासन पुणे संशोधन केंद्र संचालक डॉ.संजय देशमुख, ठाणे जिल्हा प्रशिक्षण केंद्र,वैद्यकीय अधिकारी डॉ.अंजली चौधरी, डॉ.आकांक्षा, आरोग्य निरीक्षक ठाणे डॉ.अजय इंगळे, प्रोग्राम पुणे अर्थ, संचालक डॉ.शैलेश पाटील, आरोग्य अधिकारी स्वप्नील मोरे, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.रूपाली शेडगे आदी आरोग्य अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



यामध्ये एकूण 20 मुलांच्या रक्त चाचण्या करण्यात आल्या असून येणाऱ्या काही दिवसात पुणे अर्थ आणि एआयआयएमएस, नागपूर या संस्थेच्या माध्यमातून निवडक घरामध्ये जाऊन शिसे प्रमाण स्रोत शोधण्यासाठी पाणी, माती,पेंट,मसाले,खेळणे इत्यादी नमुने संकलित करणार असल्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ.रूपाली शेडगे यांनी म्हटले आहे.

# नालिंबी खून प्रकरणाचा उलगडा | सावत्र भावानेच काढला भावाचाच काटा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण तालुक्यातील नालिंबी गावच्या जंगलात आढळलेल्या शिरविच्छिन्न अवस्थेतील मृतदेहाने संपूर्ण परिसरात खळबळ उडवून दिली होती. या प्रकरणाचा उलगडा झाला असून, सावत्र भावानेच संपत्तीच्या वादातून भावाची हत्या केल्याची माहिती समोर आली आहे.

२९ मे २०२५ रोजी सकाळी नालिंबी ते अंबरनाथ रस्त्यालगत असलेल्या निर्जन जंगलात एका अनोळखी पुरुषाचा धडविरहित मृतदेह आढळला होता. घटनास्थळी धाव घेतल्यानंतर पोलीस पाटील संगीता शिंदे यांच्या तक्रारीवरून कल्याण तालुका पोलीस ठाण्यात खूनाचा गुन्हा नोंदवण्यात आला. या अमानुष खुनाच्या तपासासाठी ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी, अप्पर पोलीस अधीक्षक भारत तांगडे आणि गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश मनोरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाला गती देण्यात आली. घटनास्थळाजवळचे सीसीटीव्ही फुटेज, मृतदेहाची ओळख पटवण्यासाठीचे तांत्रिक प्रयत्न, आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून माहितीचा शोध घेण्यात आला.



दरम्यान, पोलिस उपनिरीक्षक महेश कदम यांच्या नेतृत्वाखालील पथकाला एक महत्त्वाचा धागा मिळाला – घटनास्थळाजवळ संशयास्पदरीत्या आढळलेली कार. तपासणीअंती ही कार सलमान महंमद गौरी अन्सारी (वय २५, रा. मांडा, टिटवाळा) याच्या मालकीची असल्याचे निष्पन्न झाले. सलमानला ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता त्याने थरकाप उडवणारी कबुली दिली – मृत इसम त्याचाच सावत्र भाऊ फैसल अन्सारी (वय २९) असून, संपत्तीच्या वादातूनच त्याचा खून केला, आणि पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी मृतदेहाचे शीर धडापासून वेगळे केले. या खुनाच्या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# आंतरराष्ट्रीय योग दिन संपन्न



## एकाग्रता जपण्यासाठी प्रत्येक माणसाने योग करणे अत्यंत महत्वाचे -जिल्हाधिकारी किशन जावळे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड** : प्रत्येक माणसाने आपल्या जीवनात एकाग्रता जपण्यासाठी योग करणे अत्यंत महत्वाचे आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आज येथे केले. जिल्हा प्रशासन व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने संकुल, नेहूली येथील प्रशस्त बॅडमिंटन हॉल येथे आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) महारुद्र नाले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, राहुल कदम, जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ, मेरा युवा भारतचे अमित फुंडे, राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी श्रीम. तपस्वी गोंधळी, क्रीडा अधिकारी सुचिता ठमाळे, आकाश डोंगरे, श्री अंबिका योग कुटीरचे संस्थापक विरेंद्र पवार या संस्थेचे प्रशिक्षक तसेच स्वयंसिध्दा सामाजिक विकास संस्थेचे स्वयंसेवक, प्रशिक्षणार्थी, सरकारी अधिकारी, कर्मचारी, शालेय विद्यार्थी इत्यादी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी म्हणाले की, आपल्या देशाचे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्र महासभेत भाषण करताना संपूर्ण जगाला योगाचे महत्त्व पटवून दिले. संयुक्त राष्ट्र महासभेने अधिकृतपणे 21 जून हा 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून घोषित केला. अप्राप्त वस्तू प्राप्त होणे याला योग म्हणतात. प्राणायाम ध्यान आसने यातून मानसिक एकाग्रता वाढते. यातून आपल्याला जे साध्य करायचे आहे ते साध्य होते. नेमून दिलेले कर्म विहित वेळेत,सातत्याने केले तर आपण चांगल्या विश्वाची निर्मिती करू शकतो. एकाग्रता मिळवण्यासाठी योग केले पाहिजे आणि योगात सातत्य आवश्यक आहे आणि आयुष्यात शिस्तीची गरज आहे. शिस्त योगाद्वारे लागते,आरोग्य सुधारते. आज प्रत्येकाला ताण-तणावाला सामोरे जावे लागते. त्यामुळे तणावमुक्त राहण्यासाठी आपण सर्वांनी आपल्या जीवनशैलीमध्ये नियमितपणे योगा, व्यायामांचा समावेश करावा. योग हा फक्त व्यायाम नसून योगामुळे शारिरीक, मानसिक आरोग्य सुदृढ राहते. नियमित योगासने केल्याने शरीराला ऊर्जा प्राप्त होत असते. योगामुळे मन:शांती तर मिळतेच शिवाय तणाव दूर होऊन एकाग्रता सुध्दा वाढण्यास मदत होते, असेही जिल्हाधिकारी म्हणाले.

योग शिक्षिका माधवी पवार यांनी प्रार्थनेने योग प्रात्यक्षिकांची सुरुवात झाली. यावेळी योग पूर्व व्यायाम प्रात्यक्षिकासह प्राणायाम, नाडी शोधन क्रिया, भ्रामरी हे योग प्रकार करुन घेण्यात आले. त्यानंतर ध्यानसाधना करण्यात आली. उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेऊन योगासने केली.






# आर्य गुरुकुल मध्ये योग दिन साजरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : आर्य गुरुकुल, नांदिवली येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साही आणि समावेशक पद्धतीने साजरा करण्यात आला. ज्यामध्ये विद्यार्थी, शिक्षक आणि समुदायाला एकत्रित करून शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी योगाचे फायदे सांगितले गेले. हा कार्यक्रम शाळेच्या विद्यार्थ्यांमध्ये समग्र आरोग्य आणि निरोगीपणा वाढवण्याच्या वचनबद्धतेचा पुरावा होता.

शाळेच्या सभागृहात आयोजित एका मोठ्या गट योग सत्राने हा उत्सव सुरू झाला. या सत्रात ४०० हून अधिक विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी विविध योग आसनांमध्ये आणि श्वासोच्छवासाच्या व्यायामात भाग घेतला. शांत आणि प्रसन्न वातावरण शाळेच्या दिवसाच्या नेहमीच्या गर्दीपेक्षा अगदी वेगळे होते. "योग हा केवळ शारीरिक व्यायाम नाही; तो आपल्या जीवनात संतुलन निर्माण करण्याबद्दल आहे," असे मुख्याध्यापिका दिव्या बोरसे म्हणाल्या.

"या प्राचीन पद्धतीचा उत्सव साजरा करण्यासाठी इतके तरुण एकत्र येत आहेत हे पाहणे खूप छान आहे. आर्य गुरुकुल हे आजच्या तरुणांमध्ये संस्कृती वाढवण्याचे एक प्रबळ समर्थक आहे आणि त्यांनी योगाचा आपल्या दैनंदिन दिनचर्येत समावेश केला आहे. म्हणूनच आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगाभ्यास हा केवळ एकदाच केला जाणारा कार्यक्रम नाही तर विद्यार्थ्यांच्या दैनंदिन दिनचर्येचा एक भाग आहे.

बहुतेक विद्यार्थी अनेक योगासने करण्यात पारंगत आहेत. त्यांना आसनांची पुनरावृत्ती करण्याची संधी मिळाली. काही विद्यार्थ्यांनी विविध आसनांचे नयनरम्य प्रदर्शन देखील केले. आसनांचा सराव करताना त्यांची लवचिकता, लक्ष केंद्रित करणे आणि सहनशक्ती स्पष्टपणे दिसून आली. पुढे जाऊन, शाळा आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त पालक आणि कुटुंबातील इतर सदस्यांना सहभागी करून घेण्याची योजना आखत आहे, जेणेकरून निरोगी आणि मजबूत समुदाय निर्माण होईल. आर्य गुरुकुल येथील योग दिना निमित्ताने पालकांनी आपला अनुभव प्रकट केला.

# सुदृढ आरोग्य हीच खरी श्रीमंती आहे - कविता मोर्या

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याणच्या सम्राट अशोक विद्यालयात योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाप्रसंगी पतंजली योग समितीच्या प्रशिक्षक कविता मोर्या व प्रीती गुप्ता उपस्थित होते. कविता मोर्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाल्या विद्यार्थ्यांनी बाहेरील पदार्थ खाणे टाळावे आई व ताईने घरी बनवलेला स्वयंपाक आपण आवडीने खा, शक्ती येईल.आपल्या देशाबरोबर बाहेरील देशातील नागरिक ही योगासणे करतात सातत्याने योगा केला तर आजार होत नाही आपण निरोगी राहतो सुदृढ आरोग्य हीच आपली श्रीमंती आहे, म्हणून योगा करणे महत्त्वाचे आहे. दैनंदिन जीवनासाठी योगसाधना आणि योग तपश्चर्येचे महत्व मुख्याध्यापक गुलाबराव पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकेतून विद्यार्थ्यांना सांगितले. विद्यार्थ्यांसह मुख्याध्यापक पाटील आणि इतर शिक्षकांनी देखील योगासने केली. कविता मोर्या व प्रीती गुप्ता यांचे सह शिक्षक गणेश पाटील यांनी संस्था व शाळेच्या वतीने आभार मानले.



# रेडिओवरील संवादाद्वारे जीवनाला उभारी देण्याचे काम

## - ॲड. आशिष शेलार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड शेलार म्हणाले, सांस्कृतिक प्रवासाची मोठी वाटचाल रेडिओच्या माध्यमातून झाली आहे. शासनाने या प्रवासाची दखल घेत पुरस्कार सुरू केले आहे. 1923 मध्ये रेडिओ बॉम्बे नावाने रेडिओ वाहिनी सुरू झाली. रेडिओ क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींचा पुरस्काराच्या माध्यमातून सन्मान करणारे महाराष्ट्र हे देशात पहिले राज्य आहे. कोरोना काळात जीवनाला उभारी देण्याचे काम रेडिओवरील संवादाद्वारे करण्यात आले. यावेळी या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींचे महत्व लक्षात घेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील रेडिओ जॉकींशी संवादही साधला होता. मराठी संस्कृती रेडिओ वाहिन्यांवरील कार्यक्रमांमधून समाजापर्यंत जावू देण्याचे आवाहनही त्यांनी केले.

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांनी रेडिओ नसते, तर मी नसते, अशा शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते आशा रेडिओ जीवन गौरव पुरस्कार 2025 हा विश्वनाथ ओक यांना देण्यात आला. तसेच आशा सर्वोत्कृष्ट पुरूष निवेदक पुरस्कार हा रेडिओ मिर्ची वाहिनीचे रेडिओ जॉकी जितूराज यांना, आशा सर्वोत्कृष्ट महिला निवेदक पुरस्कार हा रेड एफ एम वाहिनीच्या रेडिओ जॉकी मल्लिशा यांना प्रदान करण्यात आला. तसेच आशा सर्वोत्कृष्ट रेडिओ केंद्र पुरस्कार रेडिओ सिटी यांना, तर आशा सर्वोत्कृष्ट कम्युनिटी रेडिओ केंद्राचा पुरस्कार विकास भारती रेडिओ केंद्र नंदूरबार यांना प्रदान करण्यात आला. त्याचप्रमाणे कार्यक्रमात 12 रेडिओ प्रकारात पुरस्कार देण्यात आले. राज्यात 16 रेडिओ वाहिन्या, 58 कम्युनिटी रेडिओ वाहिन्या व 60 केंद्र अस्तित्वात आहेत.

# महारेरा घोटाळ्यामधील ६५ अनधिकृत इमारती प्रकरण

## ५५ इमारतींना पुन्हा कल्याण डोंबिवली महापालिकेने दिल्या नोटीस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** महारेरा घोटाळयामधील 65 अनधिकृत इमारती प्रकरणात 55 इमारतींना पुन्हा कल्याण डोंबिवली महापालिकेने नोटीस दिल्याने रहिवाशांवर बेघर होण्याची टांगती तलवार असून यामुळे हजारो नागरिक होणार बेघर होण्याची शक्यता आहे.

महारेरा घोटाळयातील इमारती अनधिकृत ठरवण्यात आल्या होत्या. केडीएमसीने तात्काळ या इमारती खाली करण्याचे आदेश दिले असून इमारत रिकामी केली नाही तर पोलिस बळाचा वापर करण्याचा इशारा पालिकेने दिला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करायचे असल्याने इमारतींवर कारवाई केली जाणार असल्याची नोटीस दिली आहे. रेरा अधिकारी, पालिका अधिकारी, भू माफिया आणि राजकीय मंडळी यांच्या अभ्रद्र संगनमताने रेरा घोटाळा झाला होता.

**ऐन पावसाळ्यात सदनिका खाली करण्याचे संकट**

याप्रकरणी 19 नोव्हेंबर रोजी न्यायालयाने रेरा घोटाळयातील 65 इमारतींवर तीन महिन्यात कारवाई करण्याचे आदेश केडीएमसीला दिले होते. यामध्ये महापालिकेने दुर्लक्ष केल्याचा याचिकाकर्ते संदीप पाटील यांचा आरोप असून 27 मार्चला याचिकाकर्ते संदीप पाटील यांनी पुन्हा केडीएमसीला नोटिस देत तुम्ही न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करताय. या इमारतींवर कारवाई करा अशी मागणी केली होती त्यानंतर पुन्हा या महिन्यात केडीएमसीला नोटीस दिली.

बोगस रेरा घोटळा प्रकरणातील इमारत पाडकाम चालढकल पाहता याचिकाकर्ते संदीप पाटील कारवाई होत नसल्याने पुनश्च याचिका दाखल करणार असल्याचे समजताच केडीएमसी प्रशासनाने तातडीने बोगस रेरा घोटळा प्रकरणातील शिल्लक इमारती मधील सदनिका धारकांना तातडीने सदनिका खाली करण्याच्या नोटीस दिल्या असल्याचे समजते.

याबाबत ई प्रभाग क्षेत्राचे सहाय्यक आयुक्त तुषार सोनावणे यांनी माहिती दिली कि, बोगस रेरा घोटाळा प्रकरणी ई प्रभाग क्षेत्रातील 16 इमारतीमधील सदनिका धारकांना 15 दिवसात सदनिका तात्काळ खाली करण्याच्या नोटिसा दिल्या आहेत. तर आय प्रभागातील रेरा घोटाळयातील 6 इमारतींना नोटीस दिल्या असल्याचे सहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी सांगितले.

# जीवनदीप महाविद्यालयात फॅक्ल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम संपन्न





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली :** जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई संचलित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली येथे दिनांक 19 आणि 20 जून 2025 रोजी दोन दिवसीय "संशोधन पद्धती, नीतिमत्ता आणि आचारसंहिता" या विषयावर आधारित फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम चे आयोजन करण्यात आले होते. जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे ,नरेश पाटील यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करत कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित असलेले डॉ. सुधीर निकम ,नेहा केशरवाणी, डॉ.गौतम टेंगळे यांच्या स्वागताने कार्यक्रमाला सुरुवात केली. सर्वप्रथम डॉ.निकम यांच्या "अध्यापन आणि संशोधनातील आंतर विद्याशाखीय क्षेत्रे"या विषयावर सत्र झाले. त्यात त्यांनी अगदी सखोल पद्धतीने माहिती दिली त्यानंतर दुसऱ्या सत्रामध्ये नेहा केशरवाणी यांनी "संशोधन पद्धती आणि संशोधनासाठी विषय कसा निवडावा" या विषयावर सादरीकरण केले. शेवटचे सत्र हे गौतम टेंगळे यांच्या "अध्यापनातील व्यावसायिक नीतिमत्ता आणि आचारसंहिता" या विषयावर केंद्रित होते. या दोन दिवसीय कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्रा. डॉ.अशोक वाघ आणि उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे यांनी केले. त्याचप्रमाणे खर्डी महाविद्यालयाचे प्राचार्य कैलास कळकटे गोवेली महाविद्यालयाचे संचालक डॉ.के.बी. कोरे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळेस प्रात्यक्षिके म्हणून सॉफ्टवेअर प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. तसेच नुकताच संस्थेच्या विधी महाविद्यालयास NAAC B++व खर्डी महाविद्यालयास B दर्जा मिळाल्यामुळे विविध महाविद्यालया तर्फे सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मयुरी कांबळे प्रा सतीश लकडे व आभार प्रदर्शन रूपाली तरे यांनी केले. यावेळेस जीवनदीप महाविद्यालयाच्या संचालिका सौ स्मिता घोडविंदे, संचालक प्रशांत घोडविंदे म्हसा जीवनदीप कॉलेज प्रा. योगेश माळी जीवनदीप विधी महाविद्यालयाचे प्राचार्य जयकुमार रिजवानी तसेच सहकार्यासाठी IQAC समन्वयक प्रा. उल्हास गायकर उपस्थित होते.


प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर (तानसा), ता.शहापूर, जि.ठाणे



आपले जीवन आपल्या संकल्पाने चालत नसून ते ईश्वराधीन आहे ही निर्विवाद गोष्ट आहे व ती आपण खऱ्या सुखासाठी स्वीकारली पाहिजे. कारण तसे नसते तर जगात दुःख कोणालाच झाले नसते. ज्या घटना आपल्या जीवनात घडतील त्यात समाधान मानून राहणे ही ईश्वराधीन जीवन जगण्याची गुरुकिल्ली आहे.

गुरूमाऊली
प.पू.स.अलोकनाथजी महाराज


# कल्याण पश्चिमेतील हंसराज चाळीचा एक भाग कोसळला

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** केडीएमसीच्या क प्रभागक्षेत्र अंतर्गत असणाऱ्या टिळक चौक परिसरातील हंसराज चाळीचा भाग शुक्रवारी रात्री कोसळला सुदैवाने त्यात कोणतेही जिवितहानी झाली नाही.



**सुदैवाने जिवितहानी नाही**

कल्याण पश्चिमेतील टिळकचौक परिसरातील हंसराज ग्राऊन्ड प्लस वन चाळीचा एक भाग कोसळल्याची घटना शुक्रवारी रात्री घडली. या चाळीत एक भाडेकरू राहत असून 80वर्षी जुनी चाळ असल्याचे मालक परेश पंचपत्या यांचे म्हणणे आहे. तर राहत असलेला भाडेकरू जायला तयार नसून चाळीच्या दुरावस्था, वस्तुस्थिती संदर्भात प्रशासनाला वारंवार कळवून देखील दखल घेतली जात नाही, कारवाई करत नाही. जिवितहानी झाल्यास प्रशासन जबाबदार राहिल असे परेश यांनी प्रसिद्धी माध्यामांना सांगितले.

# ठाणे जिल्ह्यात ‘धरती आभा’ अभियानांतर्गत ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये बँकांमार्फत वित्तीय साक्षरता शिबिरांचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे जिल्हा प्रशासनाच्या “धरती आभा” अभियानांतर्गत आदिवासी व दुर्गम भागातील नागरिकांसाठी वित्तीय साक्षरता शिबिरे आयोजित करण्यात आली. ही शिबिरे राहूर, मेंडे, मोहप, दहिवली, नेवाडे इत्यादी विविध ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये पार पडली. ३० जून पर्यंत विविध ग्रामपंचायतीमध्ये ही शिबिरे घेतली जातील.





या शिबिरांमध्ये आदिवासी समाजातील नागरिकांना बँकिंग सेवा, बचत खात्याचे महत्त्व, डिजिटल व्यवहार, तसेच सरकारी सामाजिक सुरक्षा योजनांची माहिती देण्यात आली. विशेषतः खालील उपक्रम राबविण्यात आले.....

- नव्याने बचत खाती उघडली गेली(प्रधानमंत्री जनधन योजनेत)
- प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (PMJJBY) मध्ये नोंदणी
- प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना (PMSBY) मध्ये नोंदणी

बँकांचे प्रतिनिधी आणि आर्थिक साक्षरता सल्लागार यांच्या सहभागातून जागेवरच बँकिंग सेवा उपलब्ध करून दिल्या गेल्या. त्यामुळे नागरिकांनी थेट लाभ घेतला.

या शिबिरांना आदिवासी महिलांचा, युवकांचा आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. बँकिंग क्षेत्रावरील विश्वास वाढण्यास मदत झाली. गावातील विविध योजनांविषयीची माहिती व शंका निरसन यासाठीही ही शिबिरे प्रभावी ठरली.

“धरती आभा” अभियानामार्फत ठाणे जिल्हा प्रशासनाचे सर्वसमावेशक आणि तळागाळातील सक्षमीकरणाचे ध्येय जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक अभिषेक पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच विविध राष्ट्रीयकृत बँकांचे व्यवस्थापक आणि त्यांचे कर्मचारी या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नातून अधिक बळकट होत आहे.

# रस्त्यावर उभ्या असलेल्या टेम्पोला भरधाव दुचाकीची धडक

## एका दुचाकी स्वाराचा मृत्यू तर दुसरा गंभीर जखमी

### भाजप आमदार सुलभा गायकवाड यांनी जखमी तरुणाला दिला मदतीचा हात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पूर्वेतील काटेमानवली विजयनगर परिसरातील रस्त्यावर उभ्या असलेल्या तीन चाकी टेम्पो ला दुचाकीने दिलेल्या धडकेच्या अपघातात एक दुचाकी स्वाराचा मृत्यू तर दुसरा युवक गंभीर जखमी झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी घडली. याच समयी तिकडून जात असलेल्या कल्याण पूर्वच्या आमदार सुलभा गायकवाड यांनी थांबून घटनेचे गंभीर्य पाहता त्या अपघातात गंभीर जखमी झालेल्या युवकास आपल्या गाडीत सहकारी यांच्या मदतीने तातडीने उपाचार्थ रूग्णालयात पाठवले.



कल्याण पूर्वेतील संतोषीमाता मंदिर काटेमानवली विजयनगर रस्त्यावर उभ्या असलेल्या तीन चाकी टेम्पोला दुचाकी धडक दिल्याच्या घटनेत दुचाकीचालक छोटू उर्फ विनोद चव्हाण या 23वर्षीय युवकांचा जागीच मुत्यू झाला. तर दुचाकीवर मागे बसलेल्या निखिल कर्पे वय 22वर्षे हा युवक गंभीर जखमी झाला. याच समयी आमदार सुलभा गायकवाड तिकडून जात होत्या. त्यांनी तातडीने घटनेचे गंभीर्य पाहता या घटनेत गंभीर जखमी झालेल्या निखिल यांस आपल्या गाडीत सहकारी यांच्या मदतीने तातडीने उपणारार्थ खाजगी रूग्णालयात पाठविले.

# वीर भगवान बिरसा मुंडा यांचा फोटो नसल्याची सरपंच साक्षी साठे यांनी व्यक्त केली खेद !

## फलकावर फोटो लावण्याची आदिवासी विकास विभाग मंत्र्यांकडे केली मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामिण :** धरती आबा लोकसहभाग अभियान अंतर्गत सुरु असलेल्या धरती आबा लोकसहभाग जागरुकता लाभ शिबिर फलकावर वीर भगवान बिरसा मुंडा यांचा फोटो नसल्याने वाडा तालुक्यातील आबिटघर ग्रामपंचायत सरपंच साक्षी संतोष साठे यांनी यांनी खेद व्यक्त केली असून या सुरू असलेल्या उपक्रमातील फलक (बॅनर) वर भगवान बिरसा मुंडा यांचा फोटो लावण्यात यावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास मंत्री अशोकजी उईके यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. भारत सरकारने जारी केलेल्या आदिवासी अभियान गौरव वर्ष साजरे होत असून या अनुषंगाने महाराष्ट्र सरकार व राज्याच्या आदिवासी विकास विभाग यांच्या माध्यमातून 15 ते 30 जून दरम्यान या धरती आबा लोक सहभाग अभियान जागरूकता व लाभ शिबिर कार्यक्रम संपूर्ण महाराष्ट्र भर राबविला जात आहे. सध्या सुरू असलेल्या धरती आबा लोकसहभाग जागरुकता आणि लाभ सपृक्तता शिबिर फलकावर वीर भगवान बिरसा मुंडा यांचा फोटो (छायाचित्र) नसल्याने सरपंच साक्षी साठे यांनी खेद व्यक्त करून नाराजी दर्शविली आहे.

त्यामुळे ज्यांच्या नावाने हे शिबिर व उपक्रमाचे आयोजन केले जाते अर्थात भगवान बिरसा मुंडा यांचा या जारी केलेल्या फलकावर फोटो नसल्याने या गोष्टीकडे गांभीर्याने लक्ष देऊन सदरील फलक (बॅनर ) तात्काळ मागे घ्यावेत व वीर भगवान बिरसा मुंडा यांचा फोटो ठळक व दर्शनिय लावून नवीन फळक तयार करून आपल्या अधिनस्त असलेल्या यंत्रणांना अवगत करून वीर भगवान बिरसा मुंडा यांच्या छायाचित्र सहित योजनेचे नविन फळक तयार करण्याचे सुचित करावे अथवा आदेश द्यावेत अशी मागणी सरपंच साक्षी साठे यांनी आदिवासी विकास विभागाकडे केली आहे.

## योग विद्या धाम डोंबिवली माध्यमातून

# एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग थीम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** योग विद्या धाम डोंबिवली संस्थेतर्फे शनिवारी २१ जून २०२५ रोजी सलग ११ वा जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. या जागतिक योग दिनानिमित्त एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग ही थीम होती.

स्वतःची काळजी घेताना आपण पृथ्वीचीही काळजी घेतो याच उद्देशाने योग विद्या धाम डोंबिवली संस्थेतर्फे - डोंबिवली, कल्याण, टिटवाळा व आसनगाव या शहरात अनेक ठिकाणी जाऊन योग प्रोटोकॉल सत्रांचे आयोजन केले.

संस्थेचे अध्यक्ष संजय पाटील, कार्याध्यक्ष योगाचार्य नाना कुटे व कार्यवाह मृणाल धुरी यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे नियोजन व यशस्वी संचालन करण्यात आले.

संस्थेचे सर्व योग शिक्षक, योग अध्यापक, योग प्राध्यापक आणि कार्यकर्ते यांनी सर्व ठिकाणी योग प्रात्यक्षिक सत्र घेत योगाचा प्रचार व प्रसार केला. विविध वयोगटातील साधकांचा व नागरिकांचा या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

**डोंबिवली पूर्व : पतंजली सभागृह, दुसरा मजला, क्रिडाभवन, डोंबिवली पूर्व - ६० साधक**
**डोंबिवली पश्चिम : अहिल्याबाई होळकर शाळा तसेच श्रीनिवास सोसायटी - ४० साधक**
**कल्याण : जी आय आय एस इंग्रजी माध्यम शाळा, सुभेदार वाडा, कल्याण- १०० विद्यार्थी, लक्ष्मण देवराम सोनवणे महाविद्यालय, कल्याण ४० विद्यार्थी व शिक्षक.**
**आसनगाव : जगमोहन इंडस्ट्रीज, आसनगाव - ४० साधक**
**टिटवाळा : रिजेन्सी सर्वमब, टिटवाळा पूर्व - २०० नागरिक, विद्या मंदिर, मांडा-टिटवाळा - ६० शिक्षक व स्टाफ**
**तसेच एन एस एस विद्यार्थी, गृहिणी, वयोवृद्ध यांचा ऑनलाईन व ऑफलाईन सहभाग १५० साधक घेतल्याचे योग विद्या धाम डोंबिवलीच्या कार्यवाह मृणाल धुरी यांनी सांगितले.**


जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित

**प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!**

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी

संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे

Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558


# मन आणि आत्म्याच्या आरोग्यासाठी योग आवश्यक - विनय सिंह



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** योग ही आपल्या संस्कृतीची ओळख आहे. केवळ शरीर नव्हे, तर मन आणि आत्म्याच्या आरोग्यासाठी योग आवश्यक आहे. त्यामुळे शिव परिवार संस्था पर्यावरण आणि योग प्रसारासाठी सातत्याने कार्य करीत राहील. असे निसर्गरम्य येऊर, ठाणे येथे दि.२१ जून २०२५ रोजी शिव परिवार संस्थेच्यावतीने आयोजीत संस्कार योग शिबिरामध्ये मार्गदर्शन करताना शिवपरिवार संस्थेच संस्थापक ॲड. विनय कुमार सिंह यांनी सांगितले.

योगाभ्यासाची सुरुवात सूर्य नमस्कारने झाली. योग शिक्षक गोपाल ठाकुर आणि श्रीमती लक्ष्मी मौर्य यांनी योगाचे महत्त्व व आरोग्यासाठी होणारे फायदे सांगितले. यावेळी शिव परिवार प्रमुख पं. राम मिलन शुक्ला, ॲड. रंजीत सिंह, ॲड. शिक्षा संस्कार,आशीष सिंह व अनेक सदस्य उपस्थित होते.


'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Registration No. THC/256/2022-2024